**अतारांकित प्रश्नोत्तरांची ४१ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळण्याबाबत

**(१) १६९ (३०-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना कुटुंबाचे उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांना व्यावसायिक, बिगर व्यावसायिक व उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाचे शिक्षण सन २०१७ पासून घेत असलेल्यांना लागू आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सदरील योजनेतील सुमारे ५८,५०२ लाभार्थी विद्यार्थ्यांना सदरील योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर भत्ता शैक्षणिक वर्ष २०१६ - २०१७ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास रु.३००० प्रति वर्षासाठी व बिगर व्यावसायिक साठी रु.२००० व उच्च माध्यमिक साठी रु.१००० प्रमाणे होता तर शैक्षणिक वर्ष २०१८ - २०१९ मध्ये कुटुंबाचे उत्पन्न रुपये सहा लाख करून व्यवसायिक अभ्यासक्रमास महानगरासाठी रु.१०,००० व ग्रामीण भागासाठी रु.८,००० निर्वाह भत्ता करण्यात आला हे खरे आहे काय,

(४) असल्यास शैक्षणिक वर्ष २०२४ - २०२५ मध्ये वार्षिक उत्पन्न मर्यादा आठ लाख करून फक्त केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रिया द्वारे राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीच सदर भत्ता महानगरपालिका अ-ब वर्ग करिता रु.६०,००० क वर्ग क्षेत्राकरिता रु.५१,००० जिल्ह्याच्या ठिकाणी रु.४३,००० व तालुक्याच्या ठिकाणी रु.३८,००० असा करण्यात आला, या उलट बिगर व्यावसायिक व उच्च माध्यमिक साठीचा सदर भत्ता रु.२,००० व रु.१,००० इतकाच पूर्वीप्रमाणे आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त योजनेतील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळण्याबाबत तसेच बिगर व्यावसायिक व उच्च माध्यमिक साठी निर्वाह भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१९-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेकरीता मुळ अर्थसंकल्पीय तरतूद रु.१००.०० कोटी व पुनर्विनियोजनाव्दारे रु.७.३६ कोटी असा एकूण रु.१०७.३६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून, सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ मधील पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना पहिल्या व दुसऱ्या हप्त्यापोटी अनुक्रमे रु.५४,१०,६००/- (पहिला- १,०२६ व दुसरा-१,०३७ विद्यार्थी), रु.३१,००,५०,६००/- (पहिला- २०३० दुसरा- ३७,२५० विद्यार्थी) व रु.७५,८१,३८,८००/- (पहिला- ६६,८४८ व दुसरा- १०,९४४ विद्यार्थी) असा एकूण रु.१०७,३६,००,०००/- इतका निर्वाहभत्ता वितरीत करण्यात आला आहे.

तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेकरीता मुळ अर्थसंकल्पिय तरतूद रु.११५.०० कोटी व रु.२००.०० कोटी पुरवणी मागणीव्दारे मंजूर असा एकूण रु.३१५.०० कोटी इतक्या निधीपैकी आतापर्यंत एकूण रु.३०३.५० कोटी निधी प्राप्त झाला असून, सन २०१८-२१, २०२०-२१, २०२१-२२ , २०२२-२३ व २०२३-२४ मधील पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु.१,७०,०००/- (पहिला- ८ व दुसरा- ८ विद्यार्थी), रु.१६,०००/- (पहिला- २ व दुसरा-२ विद्यार्थी), रु.७,४७,४००/- (पहिला- ४४ व दुसरा- ४४ विद्यार्थी), रु.५५,०२,९६,०००/- (पहिला- ३६२ व दुसरा- ५६,२१९ विद्यार्थी) व रु.२,४८,३७,७०,६००/- (पहिला- ७०,८४९ व दुसरा- ५६,८३६ विद्यार्थी) असा एकूण रु.३,०३,५०,००,०००/- इतका निर्वाहभत्ता वितरीत करण्यात आला आहे:-

तसेच सदर योजनेकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रकमेपैकी उर्वरित रक्कम रु.११.५० कोटी इतका निधी वितरीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यातील शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या योजनेच्या उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करण्यासह वयाची मर्यादा कमी करण्याबाबत

**(२) १०९८ (२८-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निराधार नागरिकांचे जगणे सुसहय व्हावे याकरिता शासनाकडून त्यांच्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात, त्याकरीता कुटुंबाच्या एकत्रित उत्पन्नाची कमाल मर्यादा रुपये २१,०००/- इतकी असायला हवी अशी शासनाची अट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात निराधार, विधवा स्त्री असेल तर तिला शेती अथवा मोलमजुरी करूनच स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागत असून शेतात काम करणाऱ्या पुरुष मजुराला रुपये ४०० रुपये व महिलेस रुपये ३०० रोजंदारी मिळत असल्याने त्यांच्या उत्पादनात वाढ होत असल्याने काळानुरूप वाढती महागाई मजुरांना मिळणारा रोजगार पाहता २१ हजार रुपयांची मर्यादा वाढवून हे उत्पन्न मर्यादा रुपये ५० हजारांपर्यंत करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृतीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती योजनासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रामध्ये २१,०००/- रु. पेक्षा कमी उत्पन्नाचा दाखला काढणे आवश्यक असून गरजूना सदरचा दाखला मिळणे शक्य होत नाही, यामुळे उत्पन्न दाखल्याची मर्यादा वाढविण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेसाठी वयाच्या दाखल्याची आवश्यकता असल्याने वयाची अट ६५ आहे तरी ६० वर्षे करणे, तसेच उत्पन्नाची मर्यादा ही रुपये २१,०००/- वरुन ती ५०,०००/- रुपये एवढी वाढविण्यात येणे, अपंगाची टक्केवारीची अट ४१ टक्क्यावरुन ३५ टक्के एवढी करणे तसेच अर्ज सादर करण्याकरिता लागणारा विलंब व येणाऱ्या अडचणी दूर करण्यात याव्यात याबाबतची मागणी अनेक नागरीकांकडून लोकप्रतिनीधींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याकरिता उत्पन्नाच्या रक्कमेत वाढ करण्यासह वयाची मर्यादा कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत निराधार, विधवा, किमान १८ ते ६५ वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला, तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षावरील अविवाहीत स्त्री, तुरूंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त इ. घटकातील तसेच ६५ वर्षावरील पात्र वृध्द व्यक्तींना दरमहा रु.१५०० इतके अर्थसहाय्य डी.बी.टी. पोर्टलद्वारे वितरीत करण्यात येते.

विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रु.१०००/- वरुन रु. १५००/- इतकी वाढ दिनांक ५ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये केली आहे. तसेच सदरहू योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रु.१५००/- वरुन रु. २५००/- इतकी वाढ दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

सदर योजनेतील सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्नाची मर्यादा रु.२१,०००/- इतकी तर दिव्यांग लाभार्थ्यांसाठी रु.५०,०००/- इतकी आहे.

विशेष सहाय्य योजनेतील डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणी झालेल्या आधार प्रमाणीकृत लाभार्थ्यांना दरमहा डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. माहे जानेवारी, २०२६ अखेर ४७,८८,५४१ इतक्या लाभार्थ्यांना डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## झरी (जि.यवतमाळ) येथील अल्पसंख्यांक प्रवर्गासाठी असलेल्या कब्रस्थानच्या सुरक्षा भिंतीचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(३) १३८१ (१६-०४-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी (जि.यवतमाळ) येथील अल्पसंख्यांक प्रवर्गासाठी असलेल्या कब्रस्थानच्या सुरक्षा भिंतीचे काम सुरु असून सदर काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये सदर कामाच्या ठिकाणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी भेट दिली असता निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कब्रस्थानच्या सुरक्षा भिंतीचे काम करणाऱ्या ठेकेदाराने यापूर्वी मुकुटबन येथील मजीद मागील सिमेंट रोडचे केलेले कामही निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदाराची चौकशी करुन ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२२-०४-२०२६) :** (१) मा.लोकप्रतिनिधी यांनी कामाच्या ठिकाणी भेट दिली असता सदर सुरक्षा भिंतीचे जमीन स्तरावरील बीमखालील काम सुरु असतांना त्यांचे निदर्शनास आले आहे.

सदरचे काम पूर्ण असून ते प्राकलनातील/अंदाजपत्रकातील बाबी व मानकानुसार करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) झरी (जि.यवतमाळ) येथील अल्पसंख्याक प्रवर्गासाठी असलेल्या कब्रस्थानच्या सुरक्षा भिंतीचे

कामाची तपासणी राज्य गुणवत्ता नियंत्रक श्रेणी-२ यांचेमार्फत करण्यात आले असून बांधकाम समाधानकारक आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात शिफारशी करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत

**(४) १६१४ (०५-०५-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा योजनेंतर्गत दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी करार पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर शिफारशी करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता हे खरे आहे काय, तसेच समितीस करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजनासह इतर संबंधित प्रश्नांचा अभ्यास करून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, समग्र शिक्षणाच्या समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत वैद्यकीय व कौटुंबिक कारणास्तव सवेतन अनुपस्थित असलेल्या विशेष शिक्षकांना पुन्हा सेवेत रुजू करून घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी निवेदन सादर करण्यात आले होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, १० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये करार पद्धतीने शिक्षकांची भरती करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन शिक्षक भरती प्रक्रिया यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१०-०४-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात शिफारशी करण्यासाठी दनिांक २२.०८.२०२४ अन्वये समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीची दिनांक १४.१०.२०२४, दिनांक ०४.०३.२०२५ व दिनांक ०४.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुनर्रचना करण्यात आली असून समितीने तीन महिन्यांच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. सदर समितीस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती. समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक २३.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये मंजूर दोन शिक्षकांपैकी एक शिक्षक कंत्राटी तत्वावर D.Ed बेरोजगार किंवा सेवानिवृत्त शिक्षकांमधून नियुक्त करण्याबाबतची तरतूद करण्यात आली होती. आता, TAIT २०२२ नुसार शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा व पहिल्या टप्प्यातील शिफारस पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली असून, सदर शासन निर्णय दिनांक १०.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आलेला आहे. सर्व शाळांना कायमस्वरूपी नियमित शिक्षक देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून TAIT २०२२ नुसार सुमारे २९००० शिक्षकांची शिफारस झाली असून, शिक्षक भरतीमध्ये खंड पडू नये यास्तव TAIT २०२५ घेण्यात आली असून त्याचा निकाल देखील प्रसिद्ध झाला आहे. त्यानुसार पुढील शिक्षक भरती प्रक्रिया लवकरच पार पडणार आहे.

---

## धाराशिव शहरात अनेक वर्षापासून वक्फ बोर्डाच्या जमिनीवर नागरी वस्ती असल्याबाबत

**(५) १६४० (०५-०५-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव शहरात अनेक वर्षांपासून वक्फ बोर्डाच्या जमिनीवर नागरी वस्ती असून तेथील नागरीकांना घरकुल तसेच अन्य योजनांपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोगवटाप्रमाणे सदर जागा नियमित करुन तेथील नागरिकांना घरकुल तसेच इतर योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२४-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वक्फ मालमत्तांना केंद्र शासनाने पारित केलेल्या उम्मीद अधिनियम, १९९५ मधील तरतूदी लागू होतात. सदर तरतुदीनुसार वक्फ मालमत्तांची विक्री करणे वा हस्तांतरित करणे यास प्रतिबंध आहे. वक्फ अधिनियमात वक्फ मालमत्ता या केवळ कमाल ३० वर्षापर्यंतच्या कालवधीसाठी भाडेपट्टयावर देण्याची तरतूद आहे. वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे नियमित करुन नागरिकांना घरकूल वा अन्य लाभ देण्याची तरतूद उम्मीद अधिनियमामध्ये नाही.

(३) आणि (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमधील पटसंख्या वाढविण्याबाबत

**(६) १६७१ (०५-०५-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या यूडीआयएसई (UDISE) २०२३-२४ च्या आकडेवारीनुसार देशातील शाळांमधील पटसंख्या मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ३७ लाखांनी घटली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्यात विद्यार्थ्यांच्या प्रवेश संख्येच्या तुलनेत उपलब्ध शाळांचे प्रमाण लक्षणीयरीत्या अपुरे असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) असल्यास, राज्यातील सरकारी शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शासन स्तरावर कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१५-०४-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) सरकारी शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांचे वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करण्यात येते, त्याद्वारे शिक्षकांची कार्यक्षमता वाढवून सरकारी शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात. विद्यार्थी गुणवत्ता वाढ करण्याच्या अनुषंगाने सरकारी शाळांमध्ये महत्वपूर्ण शैक्षणिक उपक्रम जसे, पुनर्रचित सेतू अभ्यास,

शाळा पूर्व तयारी मेळावे, पायाभूत भाषिक साक्षरता व गणितीय विकसन कार्यक्रम (निपूण महाराष्ट्र अभियान), इयत्ता १ ली विद्यार्थी प्रवेश, शाळापूर्व तयारी कार्यक्रम अंमलबजावणी, नियमित मूल्यमापन योजना, आंनददायी अभ्यासक्रम, पूरक अध्ययन साहित्याचा वापर, शाळा सुशोभिकरण, शालेय परिसर स्वच्छता इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात. अशाप्रकारे विविध उपक्रमांचे आयोजन करून पटसंख्या वाढविण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाययोजना केल्या जातात व विद्यार्थी घट थांबविण्यासाठी प्रयत्न केले जातात.

तसेच, जिल्हा परिषद शाळांमध्ये अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य, संगणक प्रणाली, डिजिटल शिक्षण, प्रयोगशाळा, प्रशिक्षित शिक्षक, इमारत, स्वच्छता गृह, स्वच्छ पिण्याचे पाणी, खेळाचे मैदान, परिसराचे सौंदर्याकरण इ. बाबींसाठी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण (DPC), आदर्श शाळा योजना, समग्र शिक्षा अभियान, आयडियल सेंटर या योजनांव्दारे निधी उपलब्ध करून देण्यात येतो व जिल्हा परिषदांच्या शाळांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कला, क्रीडा व कार्यानुभव निदेशकांना**
**सेवेत कायमस्वरूपी करण्याबाबत**

**(७) १७४१ (०५-०५-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कला, क्रीडा व कार्यानुभव निदेशकांनी सन २०१२ ते २०१९ पर्यंत काम केलेल्यांना कामात कायमस्वरूपी नियुक्ती मिळण्यासाठी आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावेळी तात्कालीन शिक्षण मंत्री व आयुक्तांनी विविध मागण्या संदर्भात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण न झाल्याने पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा शिक्षकांनी या निदेशकांनी दिला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील १०० पेक्षा कमी पट झालेल्या सर्व निदेशकांची नेमणूक व्हावी, विस्थापित निदेशक ज्या शाळेत कार्यालयात आहेत त्याच शाळेवर त्यांची नेमणूक करण्यात यावी तसेच नियुक्ती झाल्यानंतर ती कायमस्वरूपी करणे अशा अनेक मागण्या शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१०-०४-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) अंशकालीन निदेशकांची नियुक्ती करणेबाबत मा.लोकप्रतिनिधी व विविध संघटनांची विविध निवेदने प्राप्त झालेली आहेत. तसेच, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अनुषंगाने शासन पत्र, दिनांक २८.०६.२०२४ अन्वये अंशकालीन निदेशक ज्या शाळेत कार्यरत होते त्या शाळेची पटसंख्या १०० पेक्षा जास्त असेल याची खात्री करून हजर करून घेण्याचे तसेच, संबंधित शाळेची पटसंख्या १०० पेक्षा कमी असल्यास १०० पटसंख्या असणाऱ्या नजीकच्या शाळेत हजर करून घेण्याचे निर्देश देण्यात आले होते.

यासंदर्भात रिट याचिका क्र. ८७८६/२०२१ मधील अंतरिम अर्ज क्र. ३००३/२०१९ व सलग्न याचिका /अंतरिम अर्ज यामधील मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०२ एप्रिल, २०२४ व दिनांक ०८ मे, २०२४ रोजी पारित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय, दिनांक ०५.०६.२०२५ अन्वये अंशकालीन निदेशकांची नियुक्ती करणेबाबत सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये ३५२९ अंशकालीन निदेशकांना माहे जून, २०२५

पासून नियुक्ती देण्यात आली आहे.

शासन निर्णय, दिनांक ०५.०६.२०२५ रोजीच्या धोरणानुसार, राज्यातील शाळांमध्ये रूजू करून घेण्यात आलेल्या अंशकालीन निदेशकांची नियुक्ती प्रत्येक शैक्षणिक वर्षातील जास्तीत जास्त १० महिन्यांच्या कालावधीकरिता करण्यात आली आहे. तसेच, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र. १२२३८/२०१७ व संलग्न इतर याचिकांमधील दिनांक २१.१०.२०२० रोजी पारित केलेल्या आदेशानुसार अंशकालीन निदेशकांचा कायम संवर्ग असेल तरी त्या पदावर काम करणारी व्यक्ती कायम (Permanent) होत नाही. सदर पदावरील नियुक्त उमेदवारांना सेवेत कायम करण्याचा व नियमित सेवेचा कोणताही लाभ अनुज्ञेय असणार नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आरटीई अंतर्गत शाळांमध्ये रिक्त असलेल्या प्रवेश प्रक्रियेबाबत

**(८) १८३० (०५-०५-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायदयांतर्गत (आरटीई) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत प्रवेशासाठी उपलब्ध जागा वाढल्या असल्या तरी राज्यातील शाळांची संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे का,

(२) असल्यास, अकोला जिल्हयात १९१ शाळांमध्ये १९९२ जागा रिक्त असून गतवर्षीच्या तुलनेत ६ शाळा कमी झाल्या असून २२ जागाही कमी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण हक्क कायदा (आरटीई) च्या अंतर्गत पूर्व प्राथमिक वर्गासाठी प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या रकमेचा परतावा मिळत नसल्याने पिंपरी चिंचवड व पुणे शहरातील अनेक आरटीई प्रवेशासाठी नोंदणी केलेल्या शाळांनी पूर्व प्राथमिक वर्गात प्रवेश देणे बंद केले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, पिंपरी चिंचवड व पुणे शहरातील नोंदणी केलेल्या १७० शाळांपैकी फक्त तीनच शाळांनी आरटीई अंतर्गत पूर्व प्राथमिक वर्गात प्रवेश दिला असून गतवर्षी अकोला जिल्हयात १९७ शाळांनी आरटीईसाठी नोंदणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पिंपरी चिंचवड व पुणे शहरातील इतर शाळांनी इयत्ता पहिली पासून प्रवेश देण्याचा निर्णय घेतला असून आरटीई अंतर्गत प्रवेश घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची बॅच प्रेफरन्स मध्ये दुजाभाव करत सदर शाळा नियमबाह्यरीत्या वेगवेगळया बॅचेस घेत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सी.बी.एस.सी. अभ्यासक्रम असलेल्या शाळेत आरटीई अंतर्गत प्रवेश देताना भविष्यात मुलांना शैक्षणिक वाटचालीत अडचण होऊ नये म्हणून शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२४-०२-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) आरटीई अंतर्गत नोंदणी करणे शाळांना बंधनकारक आहे. त्यानुसार शाळेची नोंदणी ऑनलाईन पोर्टलवर करतांना शाळांनी अल्पसंख्यांक प्रमाणपत्र सादर केल्यास त्या शाळांना सुट देण्यात येते.

शिक्षण हक्क कायदयांतर्गत (आरटीई) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत प्रवेशासाठी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उपलब्ध जागा वाढल्या आहेत. सन २०२४-२५ या वर्षामध्ये ५६६५ सन २०२५-२६ या वर्षामध्ये ८३१५ जागा वाढल्या आहेत.

शिक्षण हक्क कायदा (आरटीई) च्या अंतर्गत पूर्व प्राथमिक वर्गासाठी प्रवेश देण्यात आलेल्या पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या रकमेचा परतावा पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या मार्फत देण्यात येतो. या प्रकरणी दिल्ली पब्लिक स्कूल, हडपसर या शाळेने केलेल्या तक्रारीवरून शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका यांच्या कार्यालयामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

पुणे शहरातील नोंदणी केलेल्या ३७२ शाळांपैकी बारा शाळांनी आरटीई अंतर्गत पूर्व प्राथमिक वर्गात प्रवेश दिला आहे.

आरटीई कायदा, २००९ नुसार दिनांक २१/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित शाळेने २५ टक्के प्रवेशाकरिता प्रवेश स्तर (Entry Level) नोंदवावेत, प्रवेश स्तर (Entry Level) शाळेने ठरवावा असे नमूद केले आहे. तसेच, शासन निर्णय, दिनांक १६.०१.२०१८ अन्वये आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार, पुणे शहरातील ३१९ शाळांनी इयत्ता पहिली पासून प्रवेश देण्याचा निर्णय घेतला असून आरटीई अंतर्गत प्रवेश घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये दुजाभाव करत नाहीत.

(६) राज्यातील सर्व अभ्यासक्रमांच्या शाळांची नोंद आरटीई पोर्टलवर करण्यात आल्याप्रमाणे नियमानुसार पात्र शाळांचा समावेश ऑनलाईन प्रवेश प्रणालीवर करण्यात येतो. त्यानुसार, बालकांना शाळांमध्ये प्रवेशस्तरावर एकूण प्रवेश संख्येच्या २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यात येतो. बालकांना ऑनलाईन प्रवेश प्रणालीच्या प्रक्रियेमध्ये अडचणी येऊ नयेत, याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या स्तरावरून सूचना देण्यात येतात.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील शालेय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर निश्चित करण्याबाबत

**(९) १८७६ (०५-०५-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय शिक्षण विभागातील नागपूर जिल्हयाच्या शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक स्तर जाणून घेण्यासाठी “पारख“ हा कार्यक्रम माहे डिसेंबर, २०२४ मध्ये राबविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील सर्व माध्यमांच्या सर्व आस्थापनांच्या एकूण १४८ शाळांची निवड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्तर सांगणारे ठळक मुद्दे कोणते असून याबाबत अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक स्तर उंचविण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२६-०२-२०२६) :**(१) होय, हे खरे आहे,

(२) हे अंशत: खरे आहे. नागपूर जिल्हयातील सर्व शाळा व्यवस्थापनांच्या शाळांतून १२९ शाळांची निवड करण्यात आली आहे.

(३) विद्यार्थ्यांच्या इयत्तेनुसार मुलभूत स्तर (इयत्ता तिसरी), पूर्वतयारी स्तर (इयत्ता सहावी) व मध्यम स्तर (इयत्ता नववी) निश्चित करुन भाषा, गणित, विज्ञान व समाजशास्त्र या विषयाबाबत लिंग, स्थान, शाळा व्यवस्थापन,

सामाजिक गट या घटकांचे सर्वेक्षण करुन निरिक्षण नोंदविण्यात आले आहे. त्यानुषंगाने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचाविण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

अध्ययन-अध्यापन साहित्य, अध्ययन निष्पत्ती निहाय कृती कार्यक्रम आराखडा तयार करण्यात करुन कृती कार्यक्रम राबविण्यात आला. शिक्षकांसाठी गणित ऑनलाईन कोर्स तयार करण्यात आला आहे. तसेच, FLN आणि निपुण महाराष्ट्र कृती कार्यक्रम अंतर्गत गणित विषयांप्रमाणेच भाषा विषयांचे ऑनलाईन कोर्स तयार करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात कामास झालेल्या विलंबाबाबत

**(१०) १८८७ (०५-०५-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड मतदारसंघांमध्ये अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात मूलभूत पायाभूत सुविधा देणे या योजनेंतर्गत सन २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षांमध्ये शासन स्तरावरून विद्युतीकरणाची कामे मंजूर झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन स्तरावरून जे आदेश जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे आलेले आहेत त्या आधारे जिल्हा परिषद, बीड सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड व सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, धाराशिव यांच्याकडे प्रशासकीय मान्यता दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त कामाचे कार्यारंभ आदेश होत असताना बहुतांश कामे ही एकाच गावातील मंजूर झालेली असून ही कामे अल्पसंख्यांक योजनेमध्ये मंजूर असताना देखील तीच कामे इतर योजनेत देखील समाविष्ट करुन तीच कामे ग्रामपंचायतीला देण्यात येणाऱ्या निधीमधूनसुद्धा प्रस्तावित केली गेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त कामांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी बीड, जिल्हा नियोजन अधिकारी, बीड व विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे लेखी स्वरूपात पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२२-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उपस्थित मुद्द्यांमधील कामे ही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, बीड व उपमुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, बीड तसेच मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड या यंत्रणांकडे प्रस्तावित केली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.अंदाजपत्रक सोबत नाहरकत प्रमाणपत्र, जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र, यासोबतच यापूर्वी सदर काम कोणत्याही योजनेतून झाले नसल्याचे खात्री करुनच कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यामधील पुरवठा विभागातील रिक्त पदांबाबत

**(११) ३३३३ (२८-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यामधील पुरवठा विभागात एकूण ६५ रिक्त असलेल्या पदांमुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात पुरवठा विभागात सहा.जिल्हा पुरवठा अधिकारी-१, सहा.लेखाधिकारी-१, निरीक्षण अधिकारी (पुरवठा) /परिमंडळ अधिकारी-३, लेखा पर्यवेक्षक/उपलेखापाल-१, पुरवठा निरीक्षक/अव्वल कारकून (पुरवठा)/धान्य खरेदी निरीक्षक-७, गोदाम व्यवस्थापक श्रेणी २ (अव्वल कारकून दर्जाचा)-४, लिपीक टंकलेखक-२४, जिल्हा तक्रार निवाण प्रणाली करीता लिपीक टंकलेखक-१, गोदाम लिपीक-१४, वाहनचालक-१, शिपाई/पहारेकरी-८ ही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील रिक्त पदांमुळे नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याबाबत अनेक अडचणी निर्माण होत आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यामधील पुरवठा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०५-०३-२०२६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) अशी बाब नाही.

(४) शासन आदेश दिनांक ०६.०९.२०२४ अन्वये रायगड जिल्ह्यामध्ये निरीक्षण अधिकारी (पुरवठा) या पदावर १४ अधिकारी यांची नियुक्ती केली आहे.

तसेच पुरवठा निरीक्षक, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३, निकाल व प्रतिक्षा यादी-१ व प्रतिक्षा यादी-२ निकालाच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यामध्ये १९ पुरवठा निरीक्षक पदांची भरती केली आहे.

रायगड जिल्ह्यातील सरळसेवेच्या कोट्यातील लिपिक टंकलेखक संवर्गातील रिक्त पदाचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे.

जिल्हा पुरवठा कार्यालय, रायगड येथील सहा लेखा अधिकारी हे रिक्त पद भरणेबाबत मा. संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय शिक्षणातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्याबाबत

**(१२) ३३५९ (०५-०५-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'प्रथम एज्युकेशन फाउंडेशन'ने केलेल्या 'असर २०२४' अहवालानुसार राज्यातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये मराठी वाचन व गणितीय क्षमतांमध्ये घसरण दिसून आलेली असून या अहवालानुसार, सुमारे २५% विद्यार्थ्यांना इयत्ता दुसरीचा मजकूर वाचता येत नाही, ६४% विद्यार्थ्यांना तीन अंकी संख्येचे एका अंकी संख्येने भागाकार करता येत नाही. तसेच, इयत्ता पाचवीतील ४२% व इयत्ता आठवीतील ३२% विद्यार्थ्यांना वाचन व

आकडेमोडीतील कौशल्ये अवगत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव, गुणवत्तापूर्ण शिक्षकांची कमतरता व शासनाच्या शैक्षणिक धोरणातील त्रुटी यामुळे परिस्थिती उद्भवली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाडा व सांगली जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतील शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेतील घसरणीमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यात होणाऱ्या प्रतिकूल परिणामांची दखल घेवून याबाबत शासनाने जबाबदार असलेल्या यंत्रणांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच शाळांमधील प्रवेशवाढ व मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२१-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

इयत्ता पहिली व दुसरी मधील वाचन व गणितीय क्रियांमध्ये राज्यातील विद्यार्थ्यांची संपादणूक व अध्ययन स्तर हा वाढल्याचे दिसून येते.

इयत्ता तिसरी मधील पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यामध्ये कोरोना मध्ये झालेला अध्ययन क्षय भरून काढण्यात येत आहे, असे दिसून येते. शासकीय शाळांमध्ये वाचनामध्ये १०.९% प्रगती दिसून येते तर खाजगी शाळांमध्ये वाचनामध्ये ८.१% प्रगती दिसून येते. गणितीय क्रियांमध्ये शासकीय शाळांमध्ये १३.१% प्रगती दिसून येते व खाजगी शाळांमध्ये ११.५% प्रगती दिसून येते.

इयत्ता ३ री तील मुले जी इयत्ता २री च्या पातळीचे वाचन करू शकतात याचे महाराष्ट्राचे प्रमाण देशपातळीपेक्षा १०% ने जास्त आहे.

इयत्ता तिसरी मध्ये गणितीय क्रियांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्र हा देशातील पहिल्या पाच राज्यांमध्ये आहे. २०२२ च्या तुलनेमध्ये २०२४ मध्ये यात १३% ची वाढ याच्यामध्ये दिसून येते.
(२) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्रातील शाळांमध्ये शैक्षणिक उत्कृष्टता साध्य करण्यासाठी प्रभावी अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, दर्जेदार शिक्षक, भक्कम पायाभूत सुविधा, अध्ययन निष्पत्तीवर भर सर्वांगीण विकास, बालसुरक्षा व समावेशकता, सक्षम नेतृत्व, डिजिटल एकात्मता आणि पालक सहभाग हे महत्त्वाचे घटक आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP २०२०) यांच्या मार्गदर्शनान्वये विभागामार्फत राबविण्यात येत आहेत.
(३) राज्यातील विविध भागातील शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी डिसेंबर २०२३ मध्ये प्रत्येक जिल्ह्याची जिल्हा शैक्षणिक स्वास्थ्य पत्रिका तयार करून प्रत्येक जिल्ह्याची शैक्षणिक प्रगतीसाठी मार्गदर्शन करण्यात आले होते.तसेच बिद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी विभागामार्फत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) भाषा सप्ताह, मैत्री गणिताशी यांसारखे उपक्रम राबविण्यात येतात.
(४) शाळापुर्व तयारी कार्यक्रम, विद्याप्रवेश, निपुण भारत उपक्रम, स्तर आधारीत अध्ययन कार्यक्रम, सेतू अभ्यासक्रम, शिक्षकांसाठी प्रशिक्षण, विद्या वाहिनी, दीक्षा पोर्टलच्या माध्यमातून प्रशिक्षण, जिल्हा शैक्षणिक स्वास्थ्य पत्रिका यांसारखे उपाययोजना विभागाद्वारे करण्यात येतात
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था – मार्टीच्या स्थापनेबाबत**

**(१३) ४३०० (१६-०६-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संदिप क्षीरसागर (बीड), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक सक्षमीकरणासाठी ‘अल्पसंख्यांक संशोधन व प्रशिक्षण संस्था (मार्टी)’ ही संस्था स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २२ ऑगस्ट, २०२४ रोजी घेतलेला आहे, तसेच या संस्थेसाठी ११ पदे व रु. ६.२५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेस स्वतंत्र लेखाशीर्ष मंजूर करण्यात आले असून कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ८ अंतर्गत नोंदणीसाठी कार्यवाही प्रस्तावित आहे, तसेच या संस्थेस “बार्टी”, “सारथी”, “महाज्योती”, “टार्टी”, “आर्टी” यांच्याप्रमाणे समान अधिकार, संचालक मंडळ, निधी, प्रशिक्षण सुविधा व नियम लागू करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्था अद्याप कार्यान्वित न झाल्यामुळे मुस्लीम व इतर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना एम.फिल., पीएच.डी., स्पर्धा परीक्षा व उच्च शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या फेलोशिप, प्रशिक्षण व मार्गदर्शनाच्या सुविधा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संस्थेची तातडीने स्थापना होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी (MRTI) स्वतंत्र लेखाशीर्ष मंजूर झाले असून सन २०२५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे रु.३.१२ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच “बार्टी”, “सारथी”, “महाज्योती”, “टार्टी” या संस्थांप्रमाणे अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI) कार्यान्वीत करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(३) अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक विकासाकरिता स्पर्धा परीक्षा योजना, उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना, परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी परदेश शिष्यवृत्ती, निवासी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण योजना इत्यादी योजनांची अंमलबजावणी शासनस्तरावरुन करण्यात येत आहे.

(४) मार्टी संस्था कार्यरत करण्याकरीता स्वतंत्र लेखाशिर्षास मंजूरी प्राप्त करणे, संस्थेतील पदांना मंजूरी घेणे, कंत्राटी तत्वावर सल्लागार नियुक्त करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांची थकीत देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) ४३८२ (२९-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२४ - २०२५ मधील राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिकशी संबंधित सर्व थकीत देयके संबंधित शाळांना दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी पर्यंत शालार्थ प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालार्थ प्रणालीत थकीत देयके ऑनलाइन सादर केली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, थकीत देयके प्रलंबित राहण्यामागील कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२४-०२-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यातील खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करणेबाबत शासन निर्णय दिनांक १५ जुलै २०१७ अन्वये सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सन २०२४-२५ पासून थकीत वेतन देयके ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येत असून, एकूण प्राप्त ६६८३४ ऑनलाईन देयकांपैकी रक्कम रु.५,४५,१०,६९,०००/-इतक्या रकमेची ५२६६३ देयके मंजूर करण्यात आली असून, ५६१५ देयके अमान्य करण्यात आली आहेत. थकीत देयकांपैकी मार्च २०२५ अखेरपर्यंत मंजूर न झालेली देयके व्यपगत झाल्याने ती पुढील वित्तीय वर्षामध्ये पुनश्च सादर करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मराठी शाळा पुनरुज्जीवित करण्याबाबत**

**(१५) ४७८४ (०५-०५-२०२५). श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी शाळा पुनरुज्जीवित करण्यासाठी शासनाने कोणते धोरण आखले आहे,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत राज्यातील शाळांमध्ये रिक्त शिक्षक पदांची संख्या किती असून शासनाने कायमस्वरूपी शिक्षक भरतीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मराठी शाळांचे सक्षमीकरण करण्यासाठी तसेच येणाऱ्या काळामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये डिजिटल शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी, विशेषतः डिजिटल क्लासरूमची संख्या वाढविण्याच्या अनुषंगाने तसेच चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये यासाठी स्वतंत्र तरतूद करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१७-०३-२०२६) :** (१) राज्यामधील सुमारे ८० टक्के शाळांमध्ये मराठी माध्यमातुन शिक्षण दिले जात असून या शाळांचा दर्जा टिकविण्याकरीता विविध योजना कार्यान्वित आहेत.
(२) सद्य:स्थितीत राज्यातील शाळामध्ये ६०३२ इतकी रिक्त पदे आहेत. सन २०२२ मध्ये शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) अंतर्गत पहिल्या टप्प्यात १८०३४ व दुसऱ्या टप्प्यात ११००० शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) २०२५ निकाल लागला असून भरती प्रक्रिया सुरू आहे.
(३) समग्र शिक्षा अभियान, आदर्श शाळा, पीएमश्री शाळा, शाळांना अध्ययन साहित्य पुरविणे, नियतकालिक मुल्यांकन चाचणी (PAT), शैक्षणिक व्हीडीओ मार्फत शिक्षण प्रशिक्षण, संशोधन विषयक उपक्रम, आनंददायी शनिवार, बालरक्षक प्रशिक्षण, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न, चर्चा प्रज्ञावंतांशी राष्ट्रीय अविष्कार अभियानांतर्गत व राज्याबाहेरील विविध शैक्षणिक आणि वैज्ञानिक संस्थांना विद्यार्थ्यांच्या अभ्यासभेटी आयोजित करण्यात येतात.
(४) ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये डिजिटल शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शासन व खाजगी संस्था उदा.CSR, SEEPZ मिळून तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षण पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत. डिजिटल शिक्षणाच्या प्रसारासाठी खालील उपक्रम राबविण्यात येत आहे -
अ) ई-विद्या पोर्टल : एक राष्ट्र एक डिजिटल प्लॅटफॉर्म योजनेंतर्गत ग्रामीण भागातही इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षण सामग्री उपलब्ध केली जाते.
ब) दिक्षा प्लॅटफॉर्म : एनसीईआरटी व राज्यमंडळाच्या अभ्यासक्रमानुसार डिजिटल पाठ्यसामग्री, शिक्षकांसाठी प्रशिक्षण, कोर्सेस, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.
क) रेडिओ आणि टी.व्ही. शैक्षणिक कार्यक्रम : ग्रामीण आणि आदिवासी भागात इंटरनेट अभाव असल्यास दुरदर्शनवरील पीएम ई विद्या कार्यक्रम रेडिओवरील शैक्षणिक सत्र आयोजित केली जातात.
ड) तसेच शाळांमध्ये ICT लॅब, स्मार्ट बोर्ड, संगणक सुविधा इत्यादी प्रदान करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची प्रवेश कागदपत्रे सादर करण्याबाबत

**(१६) ५०६६ (०५-०५-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२३-२०२४ पदवी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशाची कागदपत्रे विद्यापीठाकडे जमा करणे अत्यावश्यक असतांना मुंबई विद्यापीठांशी संलग्न असलेल्या १५२ महाविद्यालयांनी आजमितीस १२ हजार ३९१ विद्यार्थ्यांची कागदपत्रे विद्यापीठाकडे जमा केलेली नसल्याचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रक्रियेत अनेक मोठया महाविद्यालयांचा समावेश असून ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने मुदतीत कागदपत्रे शुल्कासह जमा न केल्यास विद्यार्थ्यांचे निकाल राखून ठेवणार असल्याबाबतचा इशारा विद्यापीठाने दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्यादृष्टीने सदरहू प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, कर्तव्यात कसूर करणाऱ्या सदर महाविद्यालयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१८-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठाच्या Admission, Enrolment, Eligibility and Migration (AEM) विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या पात्रता पडताळणीसाठी (Eligibility Verification) महाविद्यालयांकडून प्रवेशासंबंधित आवश्यक कागदपत्रे व माहिती सादर करणे अपेक्षित असते. तथापि, शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या कालावधीत मुंबई विद्यापीठाशी संलग्न काही महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांच्या पात्रता पडताळणीसंदर्भातील कागदपत्रे/प्रकरणे विद्यापीठाकडे वेळेत सादर न झाल्याने काही प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर प्रकरणांच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची पात्रता प्रकरणे तात्काळ सादर करण्याबाबत तसेच आवश्यक कागदपत्रे पूर्ण करण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार महाविद्यालयांद्वारे प्रलंबित प्रकरणांचे दस्तऐवज जमा झाले असून विद्यार्थ्यांना पात्र करण्यात आले आहे.

(४) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०९.१२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत संबंधित महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पवित्र पोर्टल शिक्षक भरती २०२२ अंतर्गत रयत शिक्षण संस्थेमध्ये शिफारस पात्र शिक्षकांच्या नियुक्तीबाबत

**(१७) ५१६७ (०५-०५-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टल शिक्षक पद भरती २०२२ च्या अंतर्गत रयत शिक्षण संस्थेमध्ये शिफारस पात्र असूनही नियुक्ती पासून वंचित असलेल्या शिक्षकांना आस्थापना बदलून तात्काळ नियुक्ती देण्यात यावी याबाबतचा प्रस्ताव सहसंचालक (प्रशासन अ.प.नि.), शिक्षण आयुक्तालय पुणे, यांच्याकडून प्रधान सचिव-शालेय शिक्षण म.रा. पुणे यांना देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पवित्र पोर्टल माध्यमातून फेब्रुवारी-मार्च २०२२ मध्ये घेतलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमता चाचणी (TAIT) २०२२ परीक्षेतील यशस्वी उमेदवाराच्या विनामुलाखत गटासाठीच्या निवड याद्या माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये पोर्टलवर प्रसिद्ध केल्या असून त्यात रयत शिक्षण संस्था, सातारा या संस्थेतील ८०१ उमेदवारांची नावे शिफारस पात्र करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रयत शिक्षण संस्थेच्या अंतर्गत न्यायप्रविष्ट प्रकरणामुळे पात्र अभियोग्यताधारक शिक्षक हक्काच्या नियुक्तीपासून वंचित राहिले असून रयत शिक्षण संस्थेमध्ये पात्र ठरलेल्या शिक्षकांना तात्काळ आस्थापना बदलून त्यांची इतर ठिकाणी नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शिक्षण आयुक्तालयातून प्रधान सचिवांकडे मान्यतेसाठी पाठवलेल्या शिक्षक भरतीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२२-०९-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे या उमेदवारांना नियुक्ती देता आली नाही. यापैकी काही उमेदवारांनी लवकर नियुक्ती देण्याबाबत धरणे आंदोलन मार्गाचा अवलंब केला होता. काही उमेदवारांनी रयत

शिक्षण संस्थेऐवजी अन्य संस्थेत नियुक्ती देण्याची मागणी केली होती. दिनांक २१.०४.२०२५ रोजी या उमेदवारांना नियुक्ती देण्यावरील स्थगिती मा.उच्च न्यायालयाने उठविल्यानंतर ७४८ उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही रयत शिक्षण संस्थेमार्फत करण्यात आली आहे. उर्वरित ५३ उमेदवारांना अन्य संस्थेत नियुक्ती देण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना सूचित केल्यानुसार आवश्यक कार्यवाही त्यांच्या स्तरावरुन करण्यात येत आहे.

---

## राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तासिका तत्वावरील कर्मचा-यांना कायम कंत्राटी पध्दतीने सामावून घेण्याबाबत

**(१८) ५३६२ (२८-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांना शासनातर्फे कायम कंत्राटी पध्दतीने सामावून घेण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास कौशल्य विकास मंत्री यांना लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांना कायम कंत्राटी पध्दतीने सामावून घेण्याबाबतच्या लेखी निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१२-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांना कायम कंत्राटी पध्दतीने शासनातर्फे सामावून घेण्याबाबत सन्माननीय लोकप्रतिनिधीचे प्राप्त झालेले निवेदन योग्य कार्यवाहीसाठी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्याकडे पाठविण्यात आले आहे.

राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या निदेशकांपैकी जे सद्य:स्थितीत कार्यरत आहेत आणि ज्यांची सेवा सलग ५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक झालेली आहे, त्यांना शासन सेवेत नियमित करता येईल किंवा कसे, याबाबत शासन स्तरावर विचारविनिमय सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन संस्थामध्ये कर महसुली उत्पन्न वाढीच्या विविध बाबींमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१९) ६०११ (२९-०४-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन संस्थांमध्ये उपलब्ध साधनसामुग्री, सुविधा तसेच प्रशिक्षित तांत्रिक मनुष्यबळाचा वापर करुन महसुली उत्पादनामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने सन २००३ मध्ये वेगवेगळया जिल्हयातील स्थापत्य कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण, वेगवेगळया चाचण्या, तांत्रिक सल्ला इत्यादी बाबींसाठी शुल्क आकारण्याचे शासनाने कळविले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण हे स्थळ पाहणी करणे अपेक्षित असताना देखील बऱ्याच ठिकाणी त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण हे प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळ पाहणी न करता स्थापत्य काम केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना चालू झाल्यापासून नांदेड, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर, सोलापुरसह अन्य १६

जिल्हयातील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मिळालेल्या उत्पन्नाचे लेखापरिक्षण करुन गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण तसेच तांत्रिक सल्ला व चॅरिटी सेवा पत्राबद्दल आक्षेप उपस्थित झाले असून शासन तरतुदीनुसार सुचनांचे पालन करण्याच्या सुचना शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन महाविद्यालयांना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०६-०३-२०२६) :** (१) होय

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्र निकेतन संस्थांमध्ये उपलब्ध साधनसामुग्री, सुविधा तसेच प्रशिक्षित तांत्रिक मनुष्यबळाचा वापर करुन महसूली उत्पन्नामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने दिनांक ३१.०५.२००३ रोजी सदर योजनेचा शासन निर्णय निर्गमित केला. या शासन निर्णयान्वये तांत्रिक सल्ला व चाचणी सेवेचे दर सुधारित करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.

माहे, मार्च व एप्रिल २०२४ या दरम्यान महालेखापाल कार्यालयातील लेखापरीक्षण पथकाने तंत्रनिकेतनांमध्ये सुरू असलेल्या महसूल वाढीच्या योजनातील निर्मित महसूल हा शासनास जमा होत नसल्याबद्दल तसेच अंतर्गत निर्माण केलेल्या महसुलाचे प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार वितरण होत नसल्याबद्दल लेखा आक्षेप उपस्थित केला होता.
(४) यासंदर्भात तंत्रशिक्षण संचालनालयाने दिनांक १.७.२०२४ रोजीच्या परिपत्रकन्वये सर्व शासकीय संस्थांमध्ये घेण्यात येणाऱ्या तांत्रिक सल्ला व चाचणी सेवांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कापोटी जी रक्कम जमा होते त्या रकमेचे वितरण हे सन १९९३ आणि २००३ येथील शासन निर्णयात नमूद तरतुदीनुसारच व्हावे आणि याबाबत कोणतीही अनियमितता आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची असेल अशा सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(५) याबाबत तक्रार प्राप्त झाल्यावर शासनपत्र दिनांक २४.१०.२०२४ अन्वये श्री. प्रमोद नाईक व श्रीम. नितीशा चोरघे यांची व्दिसदस्यीस समिती नेमण्यात आली. सदर समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या निर्देशानुसार, सर्व संबंधितांकडून शासन निर्णयानुसार अनुज्ञेय रकमेपेक्षा अतीप्रदान झालेल्या रकमेची वसूली करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. तसेच प्रस्तुत प्रकरणी सुधारित धोरण तयार करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील मागास वर्गातील विद्यार्थिनीच्या उपस्थिती भत्त्यात वाढ होण्याबाबत

**(२०) ६१०८ (०५-०५-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मुरजी (काका) पटेल**

**(अंधेरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गातील विद्यार्थिनीची उपस्थिती वाढविण्यासाठी शासनाने सन १९९२ पासून रोज एक रुपया उपस्थिती भत्ता सुरू केला असून त्यामध्ये अद्यापपर्यंत कोणतीच वाढ केली नसल्याने राज्यातील विद्यार्थिनींच्या पालकांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आर्थिक दुर्बल घटक, आदिवासी क्षेत्र बाहेरील अनुसूचित जाती - जमाती भटक्या जमाती अशा प्रवर्गातील कुटुंबातील लेकींना नियमित शाळेत येण्याची आवड निर्माण व्हावी याकरिता शासनाने प्रतिदिन एक रुपया प्रोत्साहन भत्ता मध्ये दहा रुपयाने वाढ करण्यात यावी अशी मागणी राज्यातील शिक्षक संघटनांकडून शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दर तिमाही उपस्थितीनुसार तो केवळ ६० ते ७० दिवसांच्या हिशोबाने द्यावा लागत असून संबंधित विद्यार्थिनींच्या पालकांना रकमेचे धनादेश देताना कमी रकमेमुळे धनादेश वटत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रत्येकी उपस्थिती मागे एक रुपया ऐवजी दहा रुपये करण्याची पालक व संबंधित मागासवर्गीय शिक्षक संघटनेच्या मागणीवर शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपस्थिती भत्ता एक रुपया वरुन दहा रुपये करण्याचा प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाकडे किंवा संबंधित विभागाकडे पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२५-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) इयत्ता १ ली ते ४ थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील सर्व मुली व आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती / जमातीच्या दारिद्रय रेषेखालील पालकांच्या मुली या लाभार्थी आहेत.

राज्यात सद्य:स्थितीत मुलींची शाळेतील उपस्थिती वाढविण्यासाठी केंद्र/राज्य पुरस्कृत विविध नवीन योजना उदा. मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठयपुस्तके योजना, मोफत गणवेष योजना, विविध शिष्यवृत्त्या, वाहतूक भत्ता, मुलींसाठी वस्तीगृह व आश्रम शाळा, कस्तुरबा गांधी विद्यालय, अशा अधिक प्रभावी नवीन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. तसेच मानव विकास मिशन मार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना व मोफत ST प्रवास योजना राबविण्यात येते. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत आहे.

तसेच, सदर योजना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १३ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना (DPC) कडे वर्ग करण्यात आलेली आहे. सदर योजनेला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात केंद्र सरकारच्या धर्तीवर केजी ते पीजी मोफत शिक्षण धोरण राबविण्याबाबत

**(२१) ६६६६ (३०-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र सरकारच्या धर्तीवर केजी ते पीजी मोफत शिक्षण धोरण राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या

विचाराधीन आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाकडून कधीपर्यत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. दादाजी भुसे (११-०३-२०२६) :** (१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींनुसार ६ ते १४ वयोगटातील वंचित व दुर्बल घटकांतील मुला/मुलींकरीता मोफ़त शिक्षण देण्यासाठी खाजगी विनाअनुदानित शाळांमधील प्रवेश स्तरावर २५ टक्के आरक्षित असणाऱ्या जागांवर प्रवेश देण्यात येतो. तसेच सदर तरतुदीनुसार शासन निर्णय दिनांक २१.०१.२०१५ अन्वये वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक स्तरावरच विना अनुदानित खाजगी शाळांमध्ये २५% जागा मोफत शिक्षणासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक १३ जून, १९९६ अन्वये सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील प्रमाणित दराने शुल्क आकारणाऱ्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांतील पहिली ते दहावीपर्यंत सर्व मुला-मुलींना निःशुल्क शिक्षण देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग दिनांक २४ ऑगस्ट, १९८३ अन्वये राज्यातील शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळांतील मुलींना इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर सन १९८६-८७ या शैक्षणिक वर्षापासून मुलींना इयत्ता बारावी पर्यंत मोफत शिक्षण देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेचा समावेश १ ली ते १० वी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण या योजनेत १९९६-९७ पासून झाला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत इयत्ता ११ वी १२ वी या दोन इयत्तातील फक्त मुलींचा समावेश या योजनेत होतो. तसेच शासन निर्णय दिनांक १५.१०.१९९६ अन्वये आर्थिक मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीद्वारे प्रोत्साहन देखिल दिले जाते.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुखेड (जि. नांदेड) तालुक्यातील बापशेटवाडी ग्रामपंचायत अंतर्गत सुरानुरा तांडा, बादावत तांडा व दामला तांडा येथील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा बंद केल्याबाबत

**(२२) ७०२६ (०५-०५-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील बापशेटवाडी ग्रामपंचायत अंतर्गत अनुक्रमे सुरानुरा तांडा, बादावत तांडा व दामला तांडा हे तीन तांडे असून तेथे जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा अस्तित्वात होती पण गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती मुखेड यांनी विद्यार्थी पटसंख्या कमी असल्याचे कारण दाखवून चुकीचा मुल्यांकन अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर केल्याने जिल्हा परिषदेची शाळा बंद झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी जिल्हा परिषद शाळा सुरु करण्याबाबत दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील तीनही तांडे १ कि.मी. च्या परिघात येत असून आर.टी.ई कायदा २००९ नुसार गावे/वाडी येथे १ कि.मी. अंतराच्या आत ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे अशी कायद्यात तरतूद असून देखील तांडयावरील काही विद्यार्थी ३ कि.मी. अंतरावर पायपीट करुन शिक्षण घेत आहेत तर काही विद्यार्थी हे शाळाबाहेर घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त तीनही तांड्यावर ३० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित असतांना वाडी/ तांड्यावरील शेक्षणिक सुविधा बंद करणे व आर.टी.ई. कायद्याचे उल्लंघन करणा-या गटशिक्षणाधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०७-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुकाअंतर्गत सुरानुरातांडा, बादाबत तांडा दामला तांडा येथे युडायस व सरल पोर्टलमध्ये शुन्य (०) पटसंख्या झाल्यामुळे सन २०१८ मध्ये सदरील शाळा बंद करण्यात आलेल्या आहेत.
तथापि, सन २०२५ मधील सर्वेक्षणानुसार सुरानुरातांडा येथे १८ विद्यार्थी, बादावत तांडा येथे १४ विद्यार्थी व दामला तांडा येथे २१ विद्यार्थी असून सदरील तांडयावरील सर्व विद्यार्थी हे लगतच्या शाळेत प्रवेशित असल्याबाबतचा अहवाल गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मुखेड यांनी त्यांचे पत्र क्र. ६१२ दिनांक ०२.०७.२०२५ अन्वये शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे सादर केला आहे
सबब उक्त तीनही शाळांचा या शैक्षणिक वर्षात पुर्नसर्वेक्षण करुन सदरील तांड्यावरील विद्यार्थी पटसंख्याचे निकष पूर्ण केल्यास सदरील तांडयावरील शाळा पूर्ववत सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका मूल्यांकन यादीत मृत प्राध्यापकांची नावे आढळून आल्याबाबत

**(२३) ७१७४ (१९-०८-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे मुल्यांकनाची प्रक्रिया सुरू असताना मुल्यांकनासाठी मृत प्राध्यापकांना बोलविण्यात आले असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठाच्या अनागोंदी कामकाजाप्रकरणी नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०६-०३-२०२६) :** (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ४८ (च) नुसार अभ्यास मंडळातर्फे मुल्यमापनाकरीता परीक्षकांची नामिका तयार करण्यात येते व कलम ४८(३) (ख) नुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळ वरील परीक्षकांच्या नामिकेमधुन परीक्षक ठरविण्यात येतात. ही प्रक्रिया निरंतर सुरू असते. त्यानुसार या यादीतील परीक्षकांना मुल्यांकनाचे पत्र निर्गमित केले जातात. परंतु उपरोक्त यादीतील एक प्राध्यापक डॉ. धाबर्डे यांचा दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी मृत्यु झाल्याची माहिती विभागाला नसल्यामुळे त्यांचे मुल्यांकनाचे पत्र निर्गमित झालेले होते.
(२) मुल्यांकन सुरू असतांना उपरोक्त बाब मुल्यांकनाकरीता आलेल्या इतर प्राध्यापकांनी लक्षात आणून दिली. त्यानुसार संबंधित मृत प्राध्यापकांचे नाव यादीतुन वगळण्यात आले आहे.

(३) उपरोक्त घटनेमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले नसून सर्व विषयांचे मुल्यमापन वेळेतच पूर्ण करण्यात आलेले आहे.
(४) त्वरीत आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

---

## राजगड (जि. पुणे) तालुक्यातील आंबेगाव खुर्द, वंजारवाडी येथे खडकवासला जलसंपदा विभागाने धरणग्रस्त शेतकऱ्यांची घरे जमीनदोस्त केल्याबाबत

**(२४) ७४४२ (१९-०८-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजगड (जि. पुणे) तालुक्यातील आंबेगाव खुर्द, वंजारवाडी येथे खडकवासला जलसंपदा विभागाने शेतकरी श्री. किसन शंकर कडू, श्री. विजय दिनकर कडू, श्री. हरिभाऊ शंकर कडू यांच्या धरणग्रस्त घरांवर पोलीस बंदोबस्तात कारवाई करून ती घरे दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास जमीनदोस्त केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कुटुंबे सन १९५७ पासून पानशेत धरणनिर्मितीमुळे विस्थापित होऊन कडेगाव येथे पुनर्वसित आहेत, परंतु तेथील जमिनीवर पाणी नसल्यामुळे हे कुटुंबीय उदरनिर्वाहासाठी पुन्हा मुळ गावी शेती व वास्तव्यास परतले होते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, आंबेगाव खुर्द व पानशेत परिसरामध्ये विकासक, हॉटेल व्यावसायिक व इतरांकडून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे करून बांधकामे करण्यात आली असूनही त्या अतिक्रमणांवर अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी ही कारवाई विशिष्ट व्यक्तींविरुद्धच केली, असा आरोप ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींकडून करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पानशेत, वरसगाव, खडकवासला धरण पाणलोट क्षेत्रात जलसंपदा विभागाच्या जागांवर असलेली इतर अतिक्रमणे, त्यावरील बांधकामे व अनधिकृत व्यवसायांची यादी तयार करुन त्यावर कारवाईचे नियोजन केले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी धरणग्रस्तांची घरे जमीनदोस्त केल्याबाबत व अतिक्रमण करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी वेल्हे यांनी दिनांक ०४/११/२०२२ अन्वये दिलेल्या आदेशानुसार दिनांक २५/०२/२०२५ रोजी सदरचे अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.

मौजे आंबेगाव खु, ता. वेल्हे येथील जमीन गट क्र. १०३ व १०४ या मिळकती श्री. किसन शंकर कडु व इतर यांच्या मालकीच्या दिसून येत आहेत. तथापि सदर मिळकती या पानशेत धरणाकरीता संपादीत झालेल्या असून श्री. किसन शंकर कडू व इतर यांना त्यामोबदल्यात दौंड तालुक्यामध्ये जमीन वाटप झालेली आहे, असे तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी वेल्हे यांच्या दिनांक ०४/११/२०२२ रोजीच्या पत्रामध्ये नमुद केले आहे.

पानशेत धरण जलाशयाकरीता संपादीत गट क्र. १०३ व १०४ मौजे आंबेगाव खु. ता. वेल्हे जि.पुणे येथे श्री. किसन शंकर कडू यांनी अनाधिकृतपणे बांधकाम केलेले होते.

(३) हे खरे नाही.

सद्यःस्थितीत पानशेत धरणाच्या जलाशयाच्या काठावर एकूण ९ ठिकाणी अतिक्रमणे निदर्शनास आली असून अतिक्रमण धारकांना दिनांक १५/०४/२०२५ रोजी रितसर नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडे अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी यंत्रसामग्री व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने क्षेत्रिय कार्यालयाने महानगरपालिकेकडून यंत्रसामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत त्यांना कळविले आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) हे खरे नाही.

सदर प्रकरणी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी वेल्हे यांनी दिनांक ०४/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या आदेशानुसार सदरचे अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेले आहे.

(५) हे खरे आहे.

(६) सद्यःस्थितीत पानशेत धरणाच्या जलाशयाच्या काठावर एकूण ९ ठिकाणी अतिक्रमणे निदर्शनास आली असून अतिक्रमण धारकांना दिनांक १५/०४/२०२५ रोजी रितसर नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडे अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी यंत्रसामग्री व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने क्षेत्रिय कार्यालयाने महानगरपालिकेकडून यंत्रसामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत त्यांना कळविले आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

---

## कल्याण (जि.ठाणे) येथे शाळेच्या टेरेसवर इन्स्टिट्यूट एज्युकेशन मार्फत बी.एड महाविद्यालय सुरु केल्याबाबत

**(२५) ७४५६ (१९-०८-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथे शाळेच्या इरने टेरेसवर इन्स्टिट्यूट एज्युकेशन मार्फत बी.एड महाविद्यालय सुरू करण्यात आल्याचे दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठामार्फत दरवर्षी नियुक्त केलेल्या समितीने संबंधित महाविद्यालयास भेट देऊन सोयीसुविधा, उपलब्ध जागा व नियमांचे पालन झाले आहे किंवा नाही यासंदर्भात अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्या आधारे संबंधित संस्था किंवा व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) इरने इन्स्टिटयूट एज्युकेशन कल्याण जि.ठाणे या महाविद्यालयाबाबत मुंबई विद्यापीठ यांच्याकडे प्राप्त तक्रारीनूसार शहानिशा करण्यासाठी मुंबई विद्यापीठामार्फत स्थानिक चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समिचा अहवाल विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवण्यात येऊन व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार सन २०२५-२६ पासून सदर महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार नाहीत. महाविद्यालयातील दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातील विद्यार्थी अन्य महाविद्यालयात समायोजित करण्याची प्रक्रिया सुरु

आहे. महाविद्यालयातील परीक्षा गैरव्यवहाराची चौकशी सुरु आहे. सदर महाविद्यालयास रु. १० लक्ष एवढा दंड आकारण्यात आला आहे. तसेच या महाविद्यालयाची संलग्नता काढून घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठात आदिवासी अभ्यास आणि विकास उत्कृष्टता या केंद्राची स्थापना अद्यापही न केल्याबाबत

**(२६) ७५८९ (०८-०९-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठात आदिवासी अभ्यास आणि विकास उत्कृष्टता (सेंटर फॉर एक्सलेन्स इन ट्रायबल स्टडीज ॲन्ड डेव्हलमेंट) या केंद्राची स्थापना अद्याप करण्यात आली नसल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या केंद्राच्या माध्यमातून कौशल्याधारित अभ्यासक्रम, संशोधन, विविध कार्यशाळा आणि शैक्षणिक उपक्रम राज्यातील इतर अकृषी विद्यापीठामध्ये राबविणे व केंद्र कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) मुंबई विद्यापीठात अनुसूचित जमाती अभ्यास व संशोधन उत्कृष्ठता केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.
(३) लागू नाही.

---

## कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील तलावांच्या संख्येत वाढ करणेबाबत

**(२७) ८०४६ (२४-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील तलावांच्या संख्येत वाढ करणे आवश्यक असल्याने संबंधितांना आदेश देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान जलसंपदा मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) निवेदनातील नमूद गांवे विखुरलेली असून ती डोंगराळ भागातील आहेत. त्यामुळे स्थानिक नाल्यावर KT weir/धरण/Nalla सिमेंट बंधारा यांची बांधकामे स्थानिक स्तर, जिल्हा परिषद यांचेमार्फत करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे सादर केल्यास त्यावर जलसंधारण महामंडळाकडून कार्यवाही करण्यात येईल, असे मृद व जलसंधारण विभागाने मान्य केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत घेण्यात येणाऱ्या परिक्षांच्या कालावधीतील अनुपस्थित प्राचार्य व सहकेंद्र प्रमुखांना दंड आकारण्याबाबत

**(२८) ८४४२ (१९-०८-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या कालावधीत काही केंद्रांवर प्राचार्यांची अनुपस्थिती, निष्काळजीपणा व गैरप्रकार घडल्यामुळे संबंधित प्राचार्यांना रु.५०,०००/- व सहकेंद्रप्रमुखांना रू.१०,०००/- दंड ठोठावण्याचा निर्णय परीक्षा मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुलगुरुंनी खुलताबाद व जालना परिसरातील महाविद्यालयांना दिलेल्या भेटीत काही केंद्रांवर प्राचार्य व सहकेंद्रप्रमुख अनुपस्थित आढळून आले असून त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर माहे एप्रिल, २०२५ मध्ये दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये शिस्तबद्धता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात घेण्यात आलेल्या परीक्षांच्या कालावधीत विद्यापीठाच्या कुलगुरूंनी परीक्षा केंद्रांना दिलेल्या आकस्मिक भेटीदरम्यान काही परीक्षा केंद्रांवर संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच विद्यापीठाने नियुक्त केलेले सहकेंद्रप्रमुख अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले. सदर बाबीचा अहवाल परीक्षा व मूल्यांकन मंडळासमोर सादर करण्यात आला. या अहवालावर मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करून समिती स्थापन करण्यात आली. समितीच्या शिफारशींनुसार परीक्षा केंद्रावर उपस्थित नसलेल्या संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांवर रुपये ५०,०००/- इतका दंड तसेच संबंधित सहकेंद्रप्रमुखांवर रुपये १०,०००/- इतका दंड आकारण्याचा निर्णय परीक्षा व मूल्यांकन मंडळाने घेतला आहे.

(२) हे खरे आहे.

कुलगुरूंनी खुलताबाद व जालना परिसरातील काही महाविद्यालयांना दिलेल्या आकस्मिक भेटीदरम्यान काही परीक्षा केंद्रांवर प्राचार्य व सहकेंद्रप्रमुख अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांकडून लेखी खुलासे मागविण्यात आले असून प्राप्त खुलासे व समितीच्या अहवालाच्या आधारे संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यांकन मंडळाने समिती गठित करून अहवाल मागविला. समितीच्या अहवालावर आधारित निर्णयानुसार संबंधित प्राचार्य व सहकेंद्रप्रमुखांवर दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच परीक्षा प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांकडून मोबाईलचा वापर झाल्याची काही प्रकरणे निदर्शनास आल्याने संबंधित विद्यार्थ्यांविरुद्धही महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार आवश्यक शिस्तभंगात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना एफआरपी अदा न केल्यामुळे त्यांच्यावर जप्तीच्या नोटिसा बजावल्याबाबत

**(२९) ८४६५ (१९-०८-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना उचित दर न दिल्यामुळे जप्तीच्या नोटिसा बजावण्यात आल्या असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एकूण किती साखर कारखान्यांना जप्तीच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, सदर थकबाकीची एकूण रक्कम किती आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (२६-०२-२०२६) :** (१) व ( २) गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये विहित मुदतीमध्ये एफआरपी अदा न केलेल्या ६५ कारखान्यांना सुनावणीसाठी आरआरसीच्या नोटीसा देण्यात आल्या.

(३) गाळप हंगाम २०२४-२०२५ मध्ये एकूण ३५ साखर कारखान्यांकडे दिनांक ३१/०१/२०२६ च्या एफआरपी अहवाला नुसार एकूण रूपये १२२.५९ कोटी थकीत आहेत.

(४) ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे कलम ३(८) मधील तरतुदीनुसार साखर कारखान्याकडील एफआरपी प्रमाणे ऊसदराची थकीत रक्कम जमीन महसुलाची थकबाकी समजुन आरआरसी आदेश पारीत करण्यात येतात व कलम ३ (९) नुसार सदर अंमलबजावणी करणेसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येते. गोकुळ शुगर्स लि.धोत्री, जि. सोलापूर या कारखान्याविरूध्द जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे आरआरसीची कारवाई चालू आहे. उर्वरित ३४ कारखान्यांची सुनावणी प्रक्रिया साखर आयुक्तालयाकडे मा. सर्वोच्च न्यायालय येथिल याचिका प्रलंबित असल्याने सदर याचिकेच्या अंतिम निर्णया अभावी प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## एशियाटिक सोसायटी ही संस्था शासनाने ताब्यात घेण्याबाबत

**(३०) ८६७६ (०९-१०-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एशियाटिक सोसायटी ही संस्था व्यवस्थापनाच्या चुकीच्या कामकाजामुळे प्रचंड मोठ्या संकटात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई एम्प्लॉईज युनियनने ही संस्था शासनाने ताब्यात घ्यावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०५-०३-२०२६) :** (१), (२) व (३) एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई एम्प्लॉईज युनियनने एशियाटिक सोसायटी ही संस्था राज्य शासनाने ताब्यात घेण्याबाबत दिनांक २७.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये निवेदन सादर केले होते.

त्यानुषंगाने, सदर निवेदनात एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई एम्प्लॉईज युनियनने नमूद केलेल्या बाबी

ह्या वस्तुस्थितीस धरुन नसल्याचे तसेच सदर संस्था महाराष्ट्र शासनास सुपूर्द करता येणार नसल्याचे एशियाटिक सोसायटी या संस्थेने ग्रंथालय संचालनालयास कळविले आहे.

एशियाटिक सोसायटी ही स्वायत्त संस्था असून संस्थेची व्यवस्था ही त्यांच्या विश्वस्तांकडून पाहिले जाते. तसेच, संस्थेतील ग्रंथालयीन व्यवस्थापनाचे अधिकार, कर्मचाऱ्यांची निवड, नियुक्ती तसेच तद्नुषंगिक बाबी एशियाटिक सोसायटी, मुंबई संस्थेच्या कार्यकारी मंडळास आहेत.

एशियाटिक सोसायटी संस्थेकडे असलेल्या दुर्मिळ ग्रंथांचे व हस्तलिखितांचे डिजिटायझेशन करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०३.०६.२०२१ अन्वये राज्य शासनाकडून रु.५.०० कोटी इतके विशेष अनुदान देण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, आतापर्यंत रु.३.९९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच, शासन निर्णय दिनांक ०८.०३.२०२३ अन्वये एशियाटिक सोसायटी, मुंबई या संस्थेस नियतकालिके, पुस्तकांची खरेदी, ग्रंथालय पायाभूत सुविधा, आस्थापना खर्च इत्यादी बाबींसाठी प्रतिवर्षी रु.१ कोटी इतका निधी उपलब्ध करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दरवर्षी सदर संस्थेस रु.१.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात येतो. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षी सदर संस्थेस रु.१.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभागीय कार्यालय स्थलांतर करणेबाबत**

**(३१) ९१७८ (३०-०७-२०२५). श्री.किसन वानखेडे (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभागीय कार्यालय, उमरखेड, जि.यवतमाळ येथे स्थलांतरीत करणेबाबत व उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र. ५ हदगांव या कार्यालयास अभियंता वर्ग उपलब्ध करुन देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र. ५ हदगाव जि. नांदेड या कार्यालयाच्या कक्षेत उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाअंतर्गत कळमनुरी, हदगांव, हिमायतनगर व उमरखेड या तालुक्यांचा समावेश आहे. कालव्याच्या एकूण लांबीपैकी ७०% सिंचन क्षेत्र हे कळमनुरी, हदगांव व हिमायतनगर तालुक्यात येते. सिंचन व्यवस्थापनासाठी उमरखेड येथे बांधकाम उपविभाग कार्यरत आहे. इसापूर डावा कालव्याची MIIP अंतर्गत दुरुस्तीची कामे हदगांव विभागाकडे आहेत. हदगांव व उमरखेड या दोन मुख्यालयातील अंतर फक्त १५ कि.मी. असल्याने विभागाचे मुख्यालय बदलणे संयुक्तिक होणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे.

ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.५ करीता मंजूर असलेली उपअभियंता संवर्गातील सर्व पदे भरण्यात आली आहेत. आगामी कालावधीत सरळसेवा/पदोन्नतीद्वारे रिक्त पदे भरण्याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत

**(३२) ९२६७ (०८-०९-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या "एनईपी सेल" ची मागील दीड वर्षांत एकही बैठक झालेली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या "एनईपी सेल" मध्ये विद्यापीठ अधिकारी, प्राचार्य व इतर सदस्यांचा समावेश असूनही, उपक्रम राबविण्यात व नियोजन करण्यात नागपूर विद्यापीठ कमी पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे एन.ई.पी. सेलच्या बैठका क्रमश: दिनांक २६.०६.२०२३, १४.०९.२०२३, २५.१०.२०२३, १२.०१.२०२४, २४.१२.२०२४ व ०६.०५.२०२५ रोजी घेण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयानुसार नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीनुसार सत्र २०२३-२४ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रम व सत्र २०२४-२५ पासून पदवी अभ्यासक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. तसेच सदर अभ्यासक्रम, परीक्षा योजना व नियमावली सर्व संबंधितांच्या माहितीकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील शाई धरणाबाबत

**(३३) ९३७३ (१९-०८-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रविंद्र चव्हाण (डोंबिवली), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील शाई धरणामुळे सुमारे ५० पेक्षा जास्त गावे व पाडे विस्थापित होत असून काळु धरणामुळे पूर्णता आठ गावे व काही गावे अंशत: बाधित होणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील स्थानिक नागरिकांनी आधी पुनर्वसन मगच धरण अशी भूमिका घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने या धरणामुळे विस्थापित होणाऱ्या शेतकऱ्यांचे आधी पुनर्वसन मगच धरण या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

शाई प्रकल्पासाठी पुर्णत: १३ गावे व अंशत: ५ गावे बाधीत होत असून काळू प्रकल्पासाठी ५ गावे पुर्णत: व ६ गावे अंशत: बाधित होणार आहेत.

(२) होय.

(३) काळू व शाई प्रकल्प मार्गी लावण्यासाठी पुनर्वसन / भूसंपादनाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) शाई नदी प्रकल्प :- शाई प्रकल्पाच्या पुनर्वसनाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

काळू नदी प्रकल्प :- काळू नदी प्रकल्पामुळे बाधित लोकांचे पुनर्वसन करण्याकरिता आवश्यक जमिनींचे भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे व उप विभागीय अधिकारी, कल्याण यांच्या कार्यालयास सादर करण्यात आले असून पुनर्वसनाची पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## टेंभू साठवण बंधाऱ्यासाठी बाधित जमिनीच्या संपादनाबाबत

**(३४) ९४२६ (२३-०७-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपसा सिंचनाच्या बंधाऱ्यामुळे कोयना नदीच्या पात्रात व काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साठत असल्यामुळे शेतकऱ्यांची बाधित होणारी सर्व जमीन रितसर संपादीत करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाधित होणाऱ्या जमिनीपोटी संबंधित शेतकऱ्यांना त्याचा योग्य मोबदला देण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, बाधित जमिनीचा देण्यात आलेल्या मोबदल्याचा दर कमी असल्याने तो शेतकऱ्यांना मान्य नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

टेंभू उपसा सिंचन बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रासाठी एकूण १५७.७४ हे. आर इतक्या क्षेत्राची आवश्यकता असून या क्षेत्रापैकी ८४.४४ हे. आर क्षेत्र संपादीत केले असून उर्वरीत ७३.३० हे. क्षेत्राची संपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) भूसंपादनाची खरेदी प्रक्रिया ही खाजगी वाटाघाटीने सुरू असून खातेदारांचे संमतीपत्र घेवूनच भूसंपादन प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर सादर करण्यात येत आहेत. तसेच, जिल्हाधिकारी, सातारा यांच्या मान्यतेनुसार संपादित जमिनीचा मोबदला वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र उर्दू साहित्य अकादमीतील रिक्त पदांबाबत

**(३५) ९८४३ (२३-०७-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र उर्दू साहित्य अकादमीमध्ये केवळ एकच अधिक्षक कार्यरत असून, अन्य अधिकृत पदाधिकाऱ्यांची नियुक्ती अद्याप झालेली नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९७५ मध्ये उर्दू अकादमीची स्थापना होऊन सुमारे २५ पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्यावर सध्या सर्व पदाधिकारी निवृत्त झाल्याने अकादमीमध्ये केवळ एकच अधीक्षक कार्यरत असून, त्यांच्याकडे पंजाब अकादमीचीही जबाबदारी सोपविल्याने दोन्ही अकादम्यांचे कामकाज प्रभावीपणे पार पाडणे कठीण जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्दू अकादमीसाठी आवश्यक पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधींकडून वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (१०-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीकरीता एकूण मंजूर पदे ७ आहेत. त्यापैकी अधिक्षक नि कार्यकारी अधिकारी व सहायक कक्ष अधिकारी पुर्णवेळ व लिपिक व टंकलेखक अतिरीक्त कार्यभाराने नियुक्त करण्यात आले आहे. उपसंपादक (उर्दू) पदाचे मागणी पत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. तसेच उर्वरीत पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीवर शासकीय/अशासकीय सदस्य नियुक्त करण्यासाठी दिनांक ३१/८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आले असून अशासकीय सदस्य नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मानखुर्द-शिवाजीनगर मध्ये उच्च शिक्षण सुविधांच्या अभावाबाबत

**(३६) ९८७४ (२४-०७-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द-शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रात मुस्लिम अल्पसंख्यांक, दलित व गरीब वर्गाची घनवस्तीय लोकसंख्या असून, सदर क्षेत्रात कोणतेही महाविद्यालय उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी लांब अंतरावरील महाविद्यालयात जावे लागत असून, विशेषतः महिला विद्यार्थिनी शिक्षण अर्धवट सोडत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या क्षेत्रामध्ये माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२५-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही, मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रामध्ये मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासुन हितकारणी कॉलेज ऑफ कॉमर्स, लालुभाई कंपाऊंड, मानखुर्द (पश्चिम), मुंबई ४०० ०४३ आणि हितकारणी कॉलेज ऑफ लॉ, लालुभाई कंपाऊंड, मानखुर्द (पश्चिम), मुंबई ४०० ०४३ या अभ्यासक्रमाच्या नवीन दोन महाविद्यालयांना परवानगी दिलेली आहे. तसेच दोन्ही महाविद्यालये सहशिक्षण (Co-education) असल्यामुळे महिला विद्यार्थीनीही शिक्षण घेवू शकतात. तसेच, १.आचार्य मराठे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, चेंबुर मुंबई, २. विवेकानंद एज्युकेशन सोसायटीचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, चेंबुर मुंबई, ३. नारायण गुरु वाणिज्य महाविद्यालय, चेंबुर मुंबई ही महाविद्यालये देखील नजीकच्या परिसरात असुन तेथे देखील महिला विद्यार्थी शिक्षण घेत आहे.
(२) हे खरे नाही, सदर विषयीचे निवेदन/ पत्र विभागास प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अल्पसंख्याक शाळांना पायाभूत सोयीसुविधा अनुदान वितरणाबाबत

**(३७) ९८७७ (०८-०९-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्यांक शाळांना पायाभूत सोयीसुविधांसाठी अनुदान रुपये १० लाख देण्याबाबतचा शासन निर्णय विधानसभा निवडणुकीपूर्वी प्रसिद्ध करण्यात आला असून, त्यानंतरही सदर योजनेअंतर्गत शाळांचे प्रस्ताव मागविण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठीच्या अल्पसंख्यांक शाळांच्या पायाभूत सुविधा अनुदान प्रस्तावांची कार्यवाही लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे प्रलंबित राहिलेली असून, अद्याप संबंधित शाळांना अनुदान वितरीत करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पात्र अल्पसंख्यांक शाळांना अद्याप अनुदान वितरीत न करण्याची कारणे काय असून, सदर अनुदान लवकरात लवकर वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही,

शासन निर्णय दिनांक ७.१०.२०२४ अन्वये सदर योजनेअंतर्गत पायाभूत सोयीसुविधेसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा रु.२.०० लाखावरून वाढवून रु.१०.०० लाख करण्यात आली आहे. तथापि, तत्पूर्वीच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी धार्मिक अल्पसंख्याक विदयार्थी बहुल शासन मान्य खाजगी अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपरिषद, नगरपालिका शाळा, व अपंग शाळां यांच्याकडून अर्ज मागविण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १९ जुलै, २०२४ अन्वये सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले होते. तद्नंतर तत्कालीन मा. मंत्री यांच्या निर्देशानुसार विभागाच्या दिनांक १९.०७.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये मागविलेले अल्पसंख्याक शाळांचे प्रस्ताव हे रद्द करण्यात आले असून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये, शासन परिपत्रक दिनांक १३.०२.२०२४ नुसार सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून पुनश्च: प्रस्ताव मागविण्यात आले होते.
(२) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये शासनास रु. ४.०० कोटी इतका निधी बीम्स प्रणालीवर प्राप्त झाला होता. यापैकी रु.३.७४ कोटी इतका निधी १८७ शाळांना वाटप करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील २० आयआयटीमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्याबाबत व रोजगार संधी वाढविण्याबाबत

**(३८) १०१२४ (०८-०९-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २० आयटीआय मध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणे, सूक्ष्म आणि लघुउद्योजकांना प्रशिक्षण देण्यासाठी उद्योजक मेळाव्याचे आयोजन करून रोजगार निर्मिती करणे, राज्यातील आयटीआय मध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षण आणि रोजगार संधी वाढविण्याबाबत तीन सामंजस्य करार केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तीन सामंजस्य करार कौशल्य उद्योजकता व नाविन्यता विभागाने बंगळूर येथील श्री ग्रामीण विकास कार्यक्रम ट्रस्ट बंगळूर, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन तसेच पुण्याची दि आसरा फाउंडेशन आणि अंधेरीतील प्रोजेक्ट, मुंबई या सामाजिक संस्थांमध्ये करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील २० आयटीआय व औसा तालुक्यात अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१३-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी पूढीलप्रमाणे सांमजस्य करार (MOU) करण्यात आले आहेत:-

(i) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व श्री.श्री. रुलर डेव्हलमेंट प्रोग्रॅम ट्रस्ट (SSRDP) व Schneider Electric India Foundation, Banglore यांचेसमवेत दिनांक५.४.२०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सदर करारानुसार, ३ वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने २० शासकीय औ.प्र.संस्थामध्ये Advance Electrical प्रयोगशाळा उभारणे व एकूण ९७५० लक्ष्यित प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

(ii) सदरहू संचालनालय व Project Mumbai या सेवाभावी संस्था यांच्यामध्ये दिनांक१५.४.२०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर करारानुसार, स्वातंत्र्यसैनिक जोसेफ (काका) बाप्टिस्ट शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथे सध्या सुरू असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक या व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये श्रवणदोष (Hearing-impaired (SHI)) उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

(iii) दि आसरा फाऊंडेशन यांच्याबरोबर महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांनी दिनांक ७.४.२०२५ रोजी सामंजस्य करार केलेला आहे.

तथापि, औसा तालुक्यात अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यासाठी कोणत्याही औद्योगिक आस्थापने समवेत सामंजस्य करार करण्यात आलेला नाही.

---

## राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (आयटीआय) प्रस्तावित खाजगीकरणाबाबत

**(३९) १०२८५ (२४-०७-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील किती शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) खाजगीकरण करण्याचा शासनाचा विचार आहे,

(२) असल्यास, या खाजगीकरणाची टप्पेनिहाय योजना काय आहे आणि कोणत्या निकषांच्या आधारावर या संस्थांची निवड केली जाणार आहे,

(३) असल्यास, शासकीय आयटीआय संस्थांचे खासगीकरण करण्याची नेमकी कारणे काय आहेत, या संस्थांच्या व्यवस्थापनात आणि गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी खाजगीकरण हाच एकमेव उपाय आहे काय,

(४) असल्यास, सदर खाजगीकरणानंतर शासकीय आयटीआय संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि इतर खर्चांबाबत कोणत्या सवलती मिळणार आहेत,

(५) असल्यास, राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या कामकाजावर आणि गुणवत्तेवर शासनाचे नियंत्रण कसे असणार आहे, तसेच आयटीआय संस्था अधिक सक्षम आणि अद्ययावत करण्यासाठी सरकारची दीर्घकालीन योजना काय आहे,

(६) असल्यास, या संस्थांमध्ये पायाभूत सुविधा, अद्ययावत अभ्यासक्रम आणि प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१३-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) ते (६) राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक १३ मे, २०२५ च्या बैठकीमधील निर्णयानुसार, दिनांक २.६.२०२५ च्या शासन निर्णयान्वये, सार्वजनिक-खाजगी भागीदारीद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अद्यावतीकरण (पीपीपी) धोरण-२०२५ निश्चित केलेले आहे.

सदरहू धोरणान्वये राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अद्ययावतीकरण/प्रशिक्षण गुणवत्तावाढ करण्यात येणार आहे. तसेच उद्योगांच्या मागणीनुसार सक्षम उद्योग सहयोगाद्वारे प्रशिक्षणार्थ्यांची रोजगार क्षमता वाढविण्याचे उदिष्ट आहे.

या धोरणानुसार संस्थांचे अद्ययावतीकरण/प्रशिक्षण गुणवत्तावाढ करण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांकडून/ विद्यार्थ्यांकडून कोणतेही शिक्षण शुल्क आकारण्यात येणार नाही.

सदरहू धोरणांतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या कामकाजावर शासनाचे नियंत्रण असणार आहे.

प्रत्येक भागीदारी केलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशासन व अंमलबजावणीकरिता संस्था व्यवस्थापन समित्यांची (IMC) स्थापना करण्यात येणार आहे. तसेच सदरहू धोरणांतर्गत सहयोगी भागीदारांमार्फत सद्यस्थितीत नियुक्त प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यामूळे प्रशिक्षीत शिक्षक उपलब्ध होतील.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये पायाभूत सुविधामध्ये सुधारणा करुन त्यांना जागतिक दर्जाची कौशल्य केंद्रे बनविण्यात येईल. ज्यामुळे रोजगारक्षमता वाढून राज्याच्या आर्थिक प्रगतीस चालना मिळेल.

## खेड, मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील टेमघर धरण बाधितांच्या पुनर्वसनाबाबत

**(४०) १०३४३ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड, मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील टेमघर धरण बाधितांचे पुनर्वसन झाले असून पवना धरण लाभक्षेत्रात मात्र खेड तालुक्यातील एकही गाव येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड तालुक्यातील ज्या गावात पुनर्वसन झाले त्या गावांची सूची शासन प्रसिद्ध करेल काय,

(३) असल्यास, टेमघर धरणातील पाणी आरक्षण चाकण औद्योगिक क्षेत्रातील गावांना नॅशनल बिल्डिंग कोड २०१६ नुसार शासन करेल काय, किंवा ते आरक्षण भामा आसखेड धरणातून समायोजन करून देण्यात येईल काय,

(४) असल्यास, मुळशी धरणात लाभ क्षेत्रातील गावांची यादी शासन जाहीर करेल काय,

(५) असल्यास, लाभक्षेत्र सोडून खेड तालुक्यात पुनर्वसन करण्यात आले असेल तर खेड तालुक्यातील विद्यमान भामा आसखेड, चास कमान, काळमोडी धरणातून पाणी आरक्षण शेती व पिण्यासाठी पाणी यासह रहिवास वापर व औद्योगिक वापर यासाठी आरक्षण समायोजन करून मिळेल काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन पत्र (महसूल व वन विभाग) दिनांक २४.०६.२०२२ अन्वये टेमघर प्रकल्पाच्या पुनर्वसन आराखड्यास सहमती कळविली आहे. टेमघर धरणग्रस्ताचे पुनर्वसन शेल पिंपळगांव, ता. खेड येथे करण्यात आले आहे.

(३) खेड तालुक्यातील चाकण औद्योगिक वसाहत व १९ गावे यांना घरगुती व औद्योगिक वापरासाठी एकुण ०.१७८ टीएमसी तसेच चाकण नगर परिषदेस ०.२८८ टीएमसी पाणी आरक्षण भामा आसखेड धरणातून मंजुर आहे.

(४) मुळशी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात पौड, विठ्ठलवाडी, कळमशेत, अकोले, शेरे, मांदेडे, आंदेशे, कोंढावळे, चिंचवड, बेलावडे, खेचरे, भाडस. बु., शिळेश्वर, असाडे, खुबवली, रावडे, दिसाली, जामगाव, माले व संभवे ही २० गावे येतात.

(५) टेमघर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन खेड तालुक्यात चासकमान प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात केलेले असल्याने स्वतंत्र पाणी आरक्षण व समायोजनाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

खेड तालुक्यातील गावठाणांना त्यांच्या मागणीप्रमाणे शासन निर्णय दिनांक १७/११/२०१६ अन्वये विविध प्रवर्गांकरीता निश्चित केलेल्या क्षेत्रीय वाटप (Sectoral Allocation) नुसार भामा आसखेड, चासकमान व कळमोडी या सिंचन प्रकल्पांतून पाणी उपलब्ध करुन देण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात मायक्रो फायनान्स कंपनीकडून महिलांचे आर्थिक शोषण होतं असल्याबाबत

**(४१) १०३८२ (२४-०७-२०२५). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६२ ला दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात मायक्रो फायनान्स कंपनी खाजगी सावकाराप्रमाणे २४ ते ४५ टक्के व्याजदर आकारत असल्याने महिलांचे आर्थिक शोषण होतं असल्याचे माहे एप्रिल, २०२५ दरम्यान निदर्शनास आले हे

खरे आहे काय,
(२) असल्यास, या मनमानी करणाऱ्या कंपनीवर शासनाने काही कार्यवाही करण्यासाठी धोरण ठरविले आहेत काय,
(३) असल्यास, याबाबत काही सामाजिक संस्थांनी मेळावे घेवून शासनास निवेदन दिल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (०९-०३-२०२६) :** (१) खरे नाही.

याबाबत शासनास अथवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी या कार्यालयास असे निवेदन वा तक्रार अर्ज प्राप्त नाही.
(२), (३) व (४) मायक्रो फायनान्स कंपनी या बिगर बँकिंग वित्तीय संस्था (Non Banking Finance Company) म्हणून काम करतात. सदर मायक्रो फायनान्स कंपनी ची नोंदणी कंपनी कायद्यानुसार कंपनी निबंधकाकडून करण्यात येते आणि मायक्रो फायनान्स कंपनींनी बिगर बँकिंग वित्तीय संस्था म्हणून व्यवसाय करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेकडून परवाना देण्यात येतो. सदर बाब ही सहकार विभागाच्या अखत्यारीत येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या मौजे कुपटेवाडी (ता.दौंड, जि.पुणे) येथील वितरिकेच्या वरील बाजूस वंचित भागाच्या सिंचनासाठी नवीन पाईप लाईन करणेबाबत

**(४२) १०८७९ (१९-०८-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या कुपटेवाडी वितरिकेद्वारे दौंड व हवेली तालुक्यातील गावांना सिंचनाकरिता पाणी उपलब्ध करुन देण्यात येत असून कुपटेवाडी वितरिकेच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त दौंड व हवेली तालुक्यातील १४ गावे पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या पाण्यापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे कुपटेवाडी (ता.दौंड, जि.पुणे) येथील वितरिकेच्या वरील बाजूस वंचित भागाच्या सिंचनासाठी नवीन पाईप लाईन करणेसाठी सर्वेक्षण करणे व निधी उपलब्ध होणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सर्वेक्षण माहे एप्रिल २०२५ मध्ये पूर्ण झाले असून त्यासाठी रुपये २५० कोटी इतक्या रकमेचा आराखडा सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) होय.
(२) होय.
(३) अंशत: खरे आहे.

सदर वितरिकेच्या बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे सर्वेक्षण व संकल्पनाचे काम पुर्ण झाले आहे. सदर कामाचे संकल्पन, रेखाचित्रे व अंदाजपत्रक याबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) सदर कामास प्रचलीत कार्यपध्दतीनुसार प्रशासकीय मान्यतेनंतर निधी उपलब्धतेची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ विद्युत /यांत्रिकी) यांच्या रिक्त पदांबाबत

**(४३) १०९७९ (२४-०७-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपदा विभागामध्ये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ विद्युत /यांत्रिकी) गट ब (अराजपात्रित) या पदाच्या सुमारे १७७२ जागा रिक्त असून या पदाची भरती सार्वजनिक बांधकाम विभाग सेवा प्रवेश नियमानुसार होत होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदासाठी सार्वजनिक बांधकाम विभागात पदविका व पदवीधारक तसेच त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या अभियंतांना पात्र केले असून त्यानुसार जलसंपदा विभागाचे सेवा प्रवेश नियम अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलसंपदा विभागातील रिक्त असलेल्या पदांमुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असून शासनाद्वारे राबविले जाणारे विविध प्रकल्प व योजना पूर्ण करणे अवघड होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी वेळोवेळी त्या संबंधित विभागाचे मंत्री तसेच राज्यपाल यांना इंजिनिअर्स असोसिएशनतर्फे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर अभियांत्रिकी पदभरती साठीची जाहिरात विनाविलंब वेळापत्रकासह तात्काळ प्रसिद्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०३-२०२६) :** (१) होय.
(२) सेवा प्रवेश नियम अद्ययावत करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत सुरु आहे.
(३) नाही.
(४) व (५) सेवा प्रवेश नियम अद्ययावत केल्यानंतर सुधारित सेवानियमानुसार वित्त विभागाच्या मान्यतेने पदभरतीबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धापेपाडा सिंचन योजना टप्पा ३ व ४ चे काम जलदगतीने करण्यासाठी सडक अर्जुनी (जि.गोंदिया) येथे उपविभागीय कार्यालय सुरु करणेबाबत

**(४४) १०९९५ (१९-०८-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्जुनी-मोरगांव सिंचन प्रकल्पासंदर्भात कार्यालय संचालक, विदर्भ पाटबंधारे भू-विकास महामंडळ, नागपूर यांनी लोकप्रतिनिधींसमवेत दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान आढावा बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत धापेपाडा सिंचन योजना टप्पा क्र. ३ व ४ ची कामे जलदगतीने पुर्ण करण्यासह बोदलकसा, कलपात्री, उमरझरी व नवेगांव-बांध या तलावात पाणी टाकून पाईप लाईनची कामे करुन सिंचन

करण्याच्या योजनेतील बदलाचे प्रस्ताव तयार करुन त्यास मान्यता घेण्याचे निश्चित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्यादृष्टीने सडक अर्जुनी येथे उपविभागीय कार्यालय सुरु करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सद्य:स्थितीत प्रकल्पाचे चरण-२ अंतर्गत बोदलकसा व चोरखमारा प्रकल्पाचे मुख्य कालवा व त्यावरील वितरीकेचे नूतनीकरणाचे प्रत्यक्ष कामे प्रगतीपथावर आहेत व पुढे उर्वरीत वितरण प्रणालीचे नूतनीकरणाचे कामे करण्यात येणार आहेत.

सदर कार्यक्षेत्र तिरोडा मुख्यालयापासून १५-२० कि.मी. अंतरावर आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाचे चरण-३ अंतर्गत बांधकामे प्रत्यक्ष कार्यस्थळावर सुरु झालेली नसून फक्त बोदलकसा तलावाच्या बाजुला पंपगृह बांधून कटंगी, चुलबंद व उमरझरी तलावापर्यंत पाणी सोडण्याच्या कामाकरीता आवश्यक भुस्तर सर्व्हेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच चरण ३ अंतर्गत चुलबंद, उमरझरी, कलपाथरी व नवेगांवबाध तलावात पाणी सोडण्या करीता येणारे काम हे नागझिरा वन्यजीव अभयारण्यातून जात असल्याने आवश्यक क्षेत्राचे वनजमीन प्रस्ताव तयार करण्याकरीता बाह्य अभिकरणाची नियुक्ती करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यानुसार सदर क्षेत्राचे वनजमीन प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर चरण ३ अंतर्गत कामे हाती घेण्यात येतील. त्यामुळे चरण ३ अंतर्गतची कामे प्रत्यक्ष हाती घेण्यात आल्यावर सडक अर्जुनी येथे उपविभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत आवश्यकता तपासून कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत

**(४५) ११०२३ (०८-०९-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांना १०, २० व ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना अद्याप लागू करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व पात्र शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२४-०२-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील शिक्षकांना १०, २०, ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना संदर्भात नस्तीवर वित्त विभागास

प्रस्ताव सादर केला असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात आले आहेत.''केंद्र शासनाने प्राध्यापक डी.पी. चटोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या शिक्षकांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार (चटोपाध्याय आयोगानुसार) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तसेच खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना शासन निर्णय दिनांक २ सप्टेंबर, १९८९ अन्वये दिनांक १ जानेवारी, १९८६ पासून केंद्र शासनाच्या धर्तीवर त्रिस्तरीय वेतनरचना विविध संवर्गात मूळ श्रेणी, वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी लागू करण्यात आली असून ती आजतागायत सुरू आहे. सेवा तीन कार्यासनाने दिलेल्या अभिप्राय पाहता व त्या अनुषंगाने विभागाने सादर केलेला खुलासा पाहता अद्याप केंद्रामध्ये शिक्षकांना अशा प्रकारची योजना लागू केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या धोरणामध्ये राज्य शासनाने बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्यांची नियुक्तीबाबत

**(४६) ११६१६ (०८-०९-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्न एकूण ८९० महाविद्यालयांपैकी १५१ महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्य नियुक्त नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या १५१ महाविद्यालयांमध्ये प्रभारी प्राचार्यांकडूनच प्रशासकीय कामकाज पाहिले जात असून त्यापैकी ९४ महाविद्यालयांमध्ये गेल्या एक वर्षापेक्षा जास्त काळ पूर्णवेळ प्राचार्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर्णवेळ प्राचार्यांची अनुपस्थिती ही राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात अडथळा ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाविद्यालयांमध्ये तात्काळ पूर्णवेळ प्राचार्यांची नियुक्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१५-०४-२०२६) :** (१) अशंत: खरे आहे.

तथापि, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित १९९ व विनाअनुदानित ७४८ असे एकूण ९४७ महाविद्यालये आहेत. त्यापैकी २९६ महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्य कार्यरत असून ६५१ महाविद्यालयामध्ये प्रभारी प्राचार्य कार्यरत आहेत.
(२) अशंत: खरे आहे.

अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये ६४ व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये ५८७ असे एकूण ६५१ महाविद्यालयांमध्ये १ वर्षापेक्षा जास्त काळापासून प्रभारी प्राचार्य कार्यरत आहेत.
(३) व (४) शासन परिपत्रक दिनांक २३.०३.२०२१ व शासन निर्णय दिनांक १२.११.२०२१ अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये प्राचार्य पदभरतीसाठी मान्यता देण्यात आली आहे. दिनांक २३.०४.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य संवर्गाच्या पदांचा पाच वर्षाचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी पदे भरण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राचार्य संवर्गाचे पद भरणेबाबतचा प्रस्ताव संबंधित संस्थेकडून प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून पद भरतीकरिता ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते.

तसेच, विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पदभरतीबाबत कार्यवाही करण्याविषयी संबंधित विनाअनुदानित महाविद्यालयांना विद्यापीठ स्तरावरुन वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्राथमिक शाळा प्रवेशात आदिवासी विद्यार्थ्यांची घट झाल्याबाबत**

**(४७) १२५०४ (०८-०९-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील दोन वर्षांमध्ये प्राथमिक शाळांमध्ये विशेषतः आदिवासी विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशात लक्षणीय घट झाल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचा शाळेतील प्रवेश वाढविण्यासाठी व शैक्षणिक गळती रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांची शाळेतील घट झाल्याचे नेमके कारण काय आहे, सदर घट रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-१२-२०२५) :** (१) राज्यातील, मागील दोन वर्षांमध्ये प्राथमिक शाळांतील विशेषत: आदिवासी विदद्यार्थी शाळा प्रवेशात U-DISE च्या डेटावरुन घट दिसून येते.

(२) शाळांमध्ये मुलांची उपस्थिती व शाळेची गुणवत्ता वृध्दींगत करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभागातर्फे दिनांक १२ मार्च, २०२५ च्या शासन निर्णयान्वये "१०० शाळांना भेटी" देणे हा उपक्रम राबविण्यात आला आहे. तसेच शाळा सुरु होण्याचे पहिल्या दिवशी शाळा प्रवेशोत्सव हा उपक्रम राबविण्यात आला आहे. शाळा प्रवेशोत्सव अंतर्गत मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री तसेच सर्व मा. मंत्री महोदय, लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठीत व्यक्ती, उच्च पदस्थ अधिकारी यांनी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि भौतिक सुविधांची पाहणी केली. तसेच प्रधानमंत्री पोषण योजना, मोफत गणवेश योजना, मोफत पाठयपुस्तके, इ. योजना राबविल्या जातात. तसेच आदिवासी विदयार्थ्यांसाठी असलेल्या तसेच त्यांचेसाठी लागु होणा-या शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजनांपैकी उदा. राष्ट्रीय दुर्बल घटकांसाठी असलेली शिष्यवृत्ती योजना (NMMS) राष्ट्रीय भारतीय सैनिक महाविदयालय डेहराडून येथील सरकारी शिष्यवृत्या (२२०२११९८) धार्मिक अल्पसंख्यांक विदयार्थीनींसाठी बेगम हजरत महल राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना आदी विस्तृत माहिती, शालेय शिक्षण विभागाच्या योजनांसह सोबतच्या पुरक टिपणीत देण्यात आली आहे.

(३) शहरी, निमशहरी व ग्रामीण भागात इंग्रजी शाळा उघडण्यात आल्याने पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे प्रवेश घेण्याचा ओढा अधिकचा असल्याने प्राथमिक शाळांमध्ये प्रवेशामध्ये घट झाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूरसह धाराशिव, अहिल्यानगर, सातारा तसेच छत्रपती संभाजीनगर या जिल्हयातील साखर कारखान्यांवर साखर आयुक्तांनी कारवाई केल्याबाबत

**(४८) १३६४५ (१९-०८-२०२५). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोडणी केलेल्या उसाचे एफआरपीप्रमाणे अंदाजे ३७२ कोटी थकविल्याने सोलापूरसह धाराशिव, अहिल्यानगर, सातारा तसेच छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील १५ साखर कारखान्यांवर साखर आयुक्तांनी कारवाई केली असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार जिल्हा अधिकारी यांच्या आदेशानुसार तहसीलदार यांनी याबाबत कारवाई केली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (१२-०१-२०२६) :** (१), (२) व (३) ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे कलम ३(३) मधील तरतुदीनुसार विहीत मुदतीमध्ये एफ.आर.पी. अदा न केलेले एकूण १५ साखर कारखान्यांविरुध्द मार्च, २०२५ मध्ये वसूली प्रमाणपत्र निर्गमित करुन संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांना वैधानिक कारवाईकरीता आदेशित केलेले आहे. सद्य:स्थितीत सदर १५ पैकी १२ साखर कारखान्यानी संपूर्ण थकित एफआरपीच्या रकमा अदा केलेल्या आहेत. उर्वरित ३ साखर कारखान्यांविरुध्द थकीत एफआरपी वसुलीची वैधानिक कारवाई संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिमूर व नागभीड (जि. चंद्रपूर) पंचायत समित्यांतील शिक्षण विभागातील रिक्त पदांबाबत

**(४९) १३९६८ (०८-०९-२०२५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर व नागभीड (जि. चंद्रपूर) पंचायत समित्यांतील गट शिक्षण अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या मंजूर आकृतीबंधापैकी निम्म्याहून अधिक पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे प्रभारी अधिकाऱ्यांवरच भरवशावरच शिक्षण विभागाचे व्यवस्थापन चालू असल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायत समित्यांतील शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१०-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील पदोन्नतीने रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथील पोलीस कवायत मैदानावर शालेय पोषण आहार कर्मचारी संघटनेने विविध मागण्यांसाठी केलेले आंदोलन**

**(५०) २०४५२ (२९-०१-२०२६). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव, (जि.नाशिक) येथील पोलीस कवायत मैदानावर शालेय पोषण आहार कर्मचारी संघटनेने विविध मागण्यांसाठी बेमुदत धरणे आंदोलन केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलनकर्त्यांनी १८ हजार मानधन, तसेच ६५ वर्षावरील कामगारांना सेवा समाप्तीच्यावेळी १ लाखाचे सानुग्रह अनुदान, आदि मागण्यांची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कामगारांच्या मागण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-०४-२०२६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत कार्यरत स्वंयपाकी तथा मदतनीस यांच्या विविध मागण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शालेय पोषण आहार कामगार संघटना फेडरेशन, (सिटू) या संघटनेने दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांना निवेदन दिले आहे.

(३) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनामध्ये रु.१,०००/- वाढ करण्याचा निर्णय दिनांक ५ जुलै, २०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

तसेच, स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांच्या स्तरावरुनही केंद्र शासनास दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजी निवेदन देण्यात आले आहे.

4) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.